# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अहमदनगर **P.S.(ठाणे):** शेवगांव
 **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0999 **Year (वर्ष):** 2024
 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**17/12/2024 19:49

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
 1. **Day(दिवस):** शनिवार **Date From (दिनांक पासून):** 30/03/2024
 **Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 30/03/2024
 **Time From (वेळेपासून):** 16:45 बजे
 **Time To (वेळेपर्यंत):** 19:30 बजे

 (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
 **Date (दिनांक ):** 17/12/2024 **Time (वेळ):** 18:00 बजे

 (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
 **Entry No. (नोंद क्र.):** 018
 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 17/12/2024 18:55 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
 1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
 पूर्व, 30 किमी **Beat No. (बिट क्र.):**
 (b) **Address (पत्ता):** राबोधेगाव, ताशेवगाव,

 (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
 **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
 **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): कानिफनाथ एकनाथ खराद

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1983

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रा मालेगाव खुर्द, ता गेवराई,शेवगांव,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रा मालेगाव खुर्द, ता गेवराई,शेवगांव,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8600411101

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अफताब शेख रा. बोधेगाव ता.शेवग | | | 1. बोधेगांव,शेवगांव,अहमदनगर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मूल्य (रु. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

S.No. **UIDB Number**
(अ.क्र.) (यु.आय.डी.बी.क्र.)

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फियादि मी कानिफनाथ एकनाथ खराद, वय 41 वर्षे, धंदा-शेती, रा. मालेगाव खुर्द, ता. गेवराई, जि. बीड, मो.नं. 8600411101.
समक्ष हजर राहून फिर्याद देतो की, मी वरील पत्त्यावर माझे कुटूंबियासह राहणेस आहे. मी दि.30/03/2024 रोजी ला.प्र.वि.अहिल्यानगर येथील पोलीस निरीक्षक श्री.आल्हाट यांना फोनव्दारे संपर्क करून लाच मागणीची तक्रार सांगितली होती. त्याप्रमाणे पोलीस निरीक्षक आल्हाट यांनी मला शेवगाव येथे सुरक्षित ठिकाणी वाहनासह व लाचेच्या रकमेसह हजर राहण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे मी सोबत माझा मुलगा शिवप्रतिक खराद असे शेवगाव येथील सुरक्षित ठिकाणी हजर असताना पोलीस निरीक्षक आल्हाट हे त्यांचे स्टाफसह शासकीय चारचाकी वाहनाने शेवगाव येथे येवुन माझी भेट घेतली त्यावेळी पोनि आल्हाट यांनी मला व मुलगा शिप्रतिक खराद याची ओळख विचारून मला सदर शासकीय वाहनात बसण्यास सांगितले. त्यानंतर पोलीस निरीक्षक आल्हाट यांनी त्यांचेसोबत हजर असलेले दोन पंच, सापळा पथकातील कर्मचारी यांचेशी माझी ओळख करून दिली. उपस्थित दोन्ही पंचांनी मला माझे नाव, पत्ता व तक्रार विचारली असता मी त्यांना माझे नाव, पत्ता वरील प्रमाणे सांगुन तक्रार सांगितली की, " मी वरिल ठिकाणी परिवारासह राहत असुन शेती व्यवसाय करून माझे परिवाराचा उदनिर्वाह करतो. माझी मुलगी साक्षी कानिफनाथ खराद ही इयत्ता 10 वी मध्ये शिक्षण घेत असुन तीची बोर्डाची परिक्षा दि.26/03/2024 रोजी संपली आहे. तिचे दहाविच्या परिक्षेचे परिक्षा केंद्र श्री.भगवानबाबा महाविदयालय बालमटाकळी येथे होते. तिला सोडणे व आणणे कामी माझा मुलगा शिवप्रतिक कानिफनाथ खराद हा येत होता. दि.26/03/2024 बालमटाकळी येथील परिक्षा केंद्रावर गोंधळ झाला असल्याचे मला मुलगा शिवप्रतिक याने सांगितले होते. दि.29/03/2024 रोजी पहाटे 02.00 वा. आमचे मालेगाव खुर्द येथील राहते घरी शेवगाव पोलीस स्टेशन येथील चार ते पाच पोलीस आले होते. त्यामध्ये शेवगाव पोलीस स्टेशनचे एपीआय माळी साहेब होते. त्यांनी दि.29/03/2024 रोजी बालमटाकळी येथील परिक्षा केंद्रावर झालेल्या गोंधळाच्या संबंधाने माझा मुलगा नामे शिवप्रतिक खराद याला अधिक चैकशिकरीता शेवगाव पोलीस स्टेशन येथे घेवुन जायचे आहे असे सांगुन मला मुलाचे वय विचारले असता मी त्यांना मुलाचे 17 वर्षे वय असल्याचे सांगितले. त्यावेळी माळी साहेबांनी आमचे कडुन मुलगा शिवप्रतिक याच्या आधारकार्डाची व शाळा सोडलेल्या दाखल्याची झेरॉक्स प्रत घेतली व मुलाला चैकशिकामी शेवगाव पोलीस स्टेशन येथे घेवुन गेले व आम्हाला सकाळी 10.00 वा. शेवगाव पोलीस स्टेशन येथे येण्यास सांगितले. त्याप्रमाणे आम्ही दि.29/03/2024 रोजी सकाळी शेवगाव पोलीस स्टेशन येथे आलो, त्यावेळी माझा मुलगा शिवप्रतिक खराद यास शेवगाव पोलीसांनी शेवगाव पोलीस स्टेशन गु.र.नं. 262/2024 भा.द.वि. कलम 353, 452, 332, 143, 146,148,149,504,506 प्रमाणे दाखल गुन्हयांमध्ये चैकशीकरीता ताब्यात घेतले असल्याचे व सदर गुन्हयाचा तपास एपीआय माळी साहेब हे करत असल्याचे आम्हाला समजले. त्यावेळी आम्ही माळी साहेबांची भेट घेतली. त्यावेळी माळी साहेबांनी आम्हाला प्राथमिक माहीती विचारली तसेच मुलांबद्दल माहीती विचारली व त्यांचे कडील समज पत्रावर सही घेतली व मुलाला आमच्या ताब्यात दिले व दि.30/03/2024 रोजी सकाळी 10.00 वा. मुलाचा रिअल मि कंपनीचा मोबाईल घेण्यासाठी पुन्हा पोलीस स्टेशनला येण्याबाबत आम्हाला सांगितले. त्यानंतर पोलीस स्टेशन आवारात आम्हाला माझे परिचयाचे पत्रकार अल्ताफ शेख रा. बालमटाकळी ता. शेवगाव हे भेटले. अल्ताफ शेख हे आम्हाला भेटल्यानंतर त्यांनी आम्हाला सांगितले की साहेबांसाठी काहीतरी करावे लागेल. तेव्हा मुलाला सोडतील. यावेळी शेख आम्हाला म्हणाले की, तुम्ही 15000/- रुपये दया मी साहेबांकडुन बोलुन तुमच्या मुलास दाखल गुन्हयातुन सोडुन देतो. शेख असे बोलल्याने माझे लक्षात आले की शेख हे माळी साहेब यांच्याकरीता लाचेची मागणी करत आहेत. मी आज मुलासह जावुन मुलाचा मोबाईल परत मिळणेकरीता माळी साहेब यांची तसेच शेख यांची भेट घेणार आहे. सदर चर्चे दरम्यान त्यांनी माळी साहेबानी तसेच शेख यांनी माळी साहेबाकरीता माझेकडे मुलाला गुन्हयातुन बाहेर काढण्याकरीता व माझे मुलाचा मोबाईल परत देण्याकरीता लाचेची मागणी केल्यास त्यांच्या

विरुध्द कायदेशिर कारवाई करावी.''अशी तक्रार सांगितली.त्यानंतर पोनि आल्हाट यांनी माझी तक्रार माझे हस्ताक्षरात लिहून देण्यास सांगितले असता मी माझे स्वहस्ताक्षरात लिहुन दिली. सदर तक्रारीवर मी, पोनि आल्हाट व पंचानी सहया केल्या. त्यानंतर माझे तक्रारी प्रमाणे शेवगाव पोलीस स्टेशनचे एपीआय माळी व खाजगी इसम शेख हे माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे ? लाचेची रक्कम कधी दयावयाची ? व कुठे दयावयाची याबाबत लाच मागणी पडताळणी करण्याचे ठरले.

त्यानंतर पोनि आल्हाट यांनी मला व पंच 1 यांना पडताळणी कारवाई दरम्यान करावयाचे कार्यवाहीबाबत सुचना दिल्या. तसेच व्हाईस रेकॉडरचे वापराबाबत माहिती दिली. त्यानंतर पोनि आल्हाट यांचे सुचनेवरुन पोकॉ कराड यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरीकार्ड टाकून त्यामध्ये कोणतीही फाईल ध्वनीमुद्रीत नसल्याची खात्री करुन दिली. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन तो माझे ताब्यात दिला. मला व पंच नं. 1 तसेच माझे सोबत हजर असलेला माझा मुलगा शिवप्रतिक खराद असे आम्हाला एपीआय माळी व खाजगी इसम अल्ताफ शेख यांची शेवगाव पोलीस स्टेशन येथे भेट घेण्यासाठी 16/44 वा. सुमारास माझेकडील मारुती कंपनीची अल्टो कार क्रं. एम.एच. 16-डि.सी. 3563 ने रवाना केले. मी,पंच नं. 1 व मुलगा शिवप्रतिक असे शेवगाव पोलीस स्टेशन येथे गेलो. त्यावेळी तेथे आम्हाला खाजगी इसम शेख भेटले त्यांचेसोबत चर्चा केल्यानंतर मी व मुलगा शिवप्रतिक असे एपीआय माळी यांच्या केबिन मध्ये गेलो त्यावेळी एपीआय माळी यांनी आमचे सोबत दाखल गुन्ह्याचे संबंधाने चर्चा केली सदर चर्चेदरम्यान त्यांनी आमच्याकडे पैशांची मागणी केली नाही त्यानंतर आम्ही एपीआय माळी यांचे केबिन मधुन बाहेर आल्यानंतर शेवगाव पोलीस स्टेशनचे आवारात आम्हाला खाजगी इसम शेख भेटले त्यावेळी खाजगी इसम शेख यांनी मुलगा शिवप्रतिक याचेविरोधात दाखल असलेल्या गुन्ह्यामधुन बाहेर काढण्यासाठी तसेच सदर गुन्ह्यात मदत करण्यासाठी एपीआय माळी यांचेकरीता 12,000/- रूपये लाचेची मागणी करून स्विकारण्याची तयारी दर्शवली त्यावेळी मी त्यांना बारा हजार जास्त होतात.त्यावेळी खाजगी इसम शेख यांनी तुम्हाला फोन करून सांगतो असे म्हणाल्यानतर मी,पंच नं. 1 व मुलगा शिवप्रतिक असे तेथुन निघुन पोनि आल्हाट व सापळा पथक थांबले त्या ठिकाणी परत आलो. तेथे पोनि आल्हाट यांचे सुचनेवरुन पोकॉ कराड यांनी माझ्याकडील व्हाईस रेकॉर्डर त्यांचे ताब्यात घेवुन तो बंद केला. पोनि आल्हाट यांनी मला व पंच नं.1 यांना एपीआय माळी व खाजगी इसम शेख यांनी यांची भेट घेण्यासाठी रवाना केले पासुन परत येई पर्यन्तच्या हकीगतीबाबत विचारता आम्ही त्यांना वरीलप्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर पोनि आल्हाट यांनी दोन्ही पंचासमक्ष व्हाईस रेकॉर्डर मधिल ध्वनीमुद्रीत संभाषण ऐकुन त्याबाबत खात्री केली.खाजगी इसम शेख यांचेसोबत झालेल्या संभाषणामध्ये मी त्यांना बारा हजार रूपये जास्त होत आहे असे म्हणालो होतो त्यावेळी खाजगी इसम शेख हे मी तुम्हाला फोन करून सांगतो, असे म्हणाल्याने लाच रकमेची निश्चीती करण्यसाती तसेच लाच देण्याचे ठिकाण निश्चीत करण्यसाठी माझ्या 8600411101 या मोबाईल क्रमांकावरुन खाजगी इसम शेख यांच्या 7498343196 या मोबाईल क्रमांकावर फोन केला असता खाजगी इसम शेख यांनी माझ्याकडे 12,000/- रूपये लाचेची मागणी केली त्यावेळी मी त्यांना बारा हजाराच्या कमी होणार नाही का? असे विचारले असता खाजगी इसम शेख हे मी साहेबांना विचारून तुम्हाला 15-20 मिनिटांमध्ये सांगतो असे म्हणुन फोन बंद केला.त्यानंतर खाजगी इसम शेख यांचा बराच वेळ झाला कॉल न आल्याने खाजगी इसम शेख यांना कॉल करण्याचे सर्वानुमते ठरले त्याप्रमाणे खाजगी इसम शेख यांना त्यांचे वरील मोबाईल क्रमांकावर फोन करून साहेबांना विचारले का असे बोललो असता खाजगी इसम शेख यांनी बोलणे झाले आहे तुम्हाला समोर आल्यावर बोलतो असे म्हणाले त्यावेळी मी खाजगी इसम शेख यांना मी शिर्डीला जाणार आहे तुम्ही सांगितले तर मी साहेबांकडे देतो त्यावेळी खाजगी इसम शेख म्हणाले कि साहेब घेणार नाही तुमच्याकडुन तुम्ही शिर्डीला जावुन या. उदया आले का बघु त्यावेळी मी त्यांना कधी यायच ते कन्फर्म सांगा असे म्हणालो असता त्यावेळी खाजगी इसम शेख हे तुम्हाला पाच मिनिटांमध्ये फोन लावतो असे म्हणुन फोन बंद केला.त्यानंतर बराच वेळ झाला तरी खाजगी इसम शेख यांचा फोन न आल्याने खाजगी इसम शेख यांना कॉल करण्याचे सर्वानुमते ठरले त्याप्रमाणे खाजगी इसम शेख यांना त्यांचे वरील मोबाईल क्रमांकावर फोन केला असता त्यांचा मोबाईल फोन बंद आला.त्यानंतर खाजगी इसम शेख यांनी माझ्याकडे शेवगाव पोलीस स्टेशन येथील एपीआय माळी यांचेकरीता 12,000/- रूपये लाचेची मागणी करून स्विकारण्याची तयारी दर्शविल्याचे निष्पन्न झाले होते परंतु सदर लाच रक्कम खाजगी इसम शेख यांना कधी व कोठे दयायची हे निश्चीत न झाल्यामुळे व खाजगी इसम शेख यांचेशी फोनवर झालेल्या संभाषणामध्ये त्यांनी "उदया बघु"असे म्हणालेले असल्याने सर्वानुमते दिनांक 31/03/2024 रोजी लाचेचा सापळा आयोजित करण्याचे ठरले त्याप्रमाणे मला पो.नि.आल्हाट यांनी कारवाईबाबत [illegible] सुचना देवुन दिनांक । । या 31/03/2024 रोजी 11.30 वा.शेवगाव येथे सुरक्षित ठिकाणी 12,000/- रूपये लाचेच्या रकमेसह हजर राहणेबाबत कळविले व मला घरी जाण्यास मोकळीक दिली त्यानंतर दिनांक 31/03/2024 रोजी 11.40 वा.चे सुमारास शेवगाव येथे सुरक्षित ठिकाणी पो.नि.आल्हाट व त्यांचेसोबत असलेले पंच व पथकाची भेट झाली.पोनि

आल्हाट यांनी खाजगी इसम शेख यांना दयावयाची लाचेची रक्कम हजर करण्यास सांगितले असता, मी माझे बचतीमधील 12,000/- रु., त्यात 500/- रुपये दराच्या 24 भारतीय चलनी नोटा हजर केल्या त्यानंतर अँन्थासिन पावडर व अ.व्हॉ. दिव्याचा वापर, गुणधर्म याबाबत मला व पंचांना माहीती देण्यात आली. मी हजर केलेल्या नोटांना पोना लाड यांनी अँन्थासिन पावडर लावली व सदर लाचेच्या नोटा माझे अंगातील पॅन्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवुन दिल्या. त्यानंतर पोनि आल्हाट यांनी मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकाला सापळा कारवाई दरम्यान करावयाचे कार्यवाहीबाबत सुचना दिल्या. त्यानंतर पोनि आल्हाट यांचे सुचनेवरुन पोकॉ सुदुक यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये नविन मेमरीकार्ड टाकले झाला.खाजगी इसम शेख यांचा मला फोन न आल्याने व खाजगी इसम शेख हे नेहमी फिरतीवर असल्याने त्यांना फोन करून भेटणेबाबत विचारणा करावी लागेल असे मी पो.नि.आल्हाट यांना सांगितल्याने खाजगी इसम शेख यांना फोन करण्याचे ठरले त्यांनंतर पो.नि.आल्हाट यांचे सुचनेप्रमाणे माझ्या 8600411101 या मोबाईल क्रमांकावरून खाजगी इसम शेख यांच्या 7498343196 या मोबाईल क्रमांकावर फोन केला असता खाजगी इसम शेख यांनी फोन उचलला नाही त्यानंतर काहि वेळ खाजगी इसम शेख यांच्या फोनची वाट पाहिली परंतु खाजगी इसम शेख यांचा फोन न आल्याने पुन्हा त्यांना फोन करण्याचे ठरले त्याप्रमाणे खाजगी इसम शेख यांच्या वरील मोबाईल क्रमांकावर फोन केला असता खाजगी इसम यांनी फोन उचलला नाही त्यानंतर बराच वेळ खाजगी इसम शेख यांच्या फोनची वाट पाहिली परंतु त्यांचा फोन न आल्याने खाजगी इसम शेख यांना त्यांचे वरील मोबाईल क्रमांकावर फोन केला असता त्यांचा फोन बंद येत होता.खाजगी इसम शेख यांचा फोन बंद येत असल्याने त्यांचेशी सपर्क होवु शकणार नाही त्यामुळे कारवाई तात्पुरती स्थगित करावी व खाजगी इसम शेख यांनी माझेशी संपर्क केल्यानंतर पुढील सापळा कारवाई आयोजित करावी असे मी कळविल्यानंतर दिनांक 31/03/2024 रोजीची सापळा कारवाई तात्पुरती स्थगित करण्यात आली व खाजगी इसम शेख यांनी माझ्याशी संपर्क केल्यानंतर तात्काळ संपर्क करणेबाबत पो.नि.आल्हाट यांनी सुचना दिल्या. त्यानंतर खाजगी इसम अल्ताफ शेख यांनी लाचमागणी केलेल्या रक्कमे संदर्भाने समक्ष अथवा हस्ते परहस्ते संपर्क केला नाही तसेच मी त्याना फोनद्वारे संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी माझा फोन उचलला नाही तसेच काहि वेळा त्यांचा मोबाईल फोन बंद येत होता. खाजगी इसम अल्ताफ शेख यांनी मला संपर्क न केल्यामुळे व शेवगाव पोलीस स्टेशनमधुन देखील मला तसेच माझ्या मुलाला दाखल असलेल्या गुन्हयाच्या संदर्भात बोलाविलेले नसल्यामुळे माझ्या लक्षात आले की, खाजगी इसम अल्ताफ शेख यांनी दि.30/03/2024 रोजी माझ्याकडे एपीआय माळी यांचेकरीता 12,000/- रूपयांची लाच मागणी केल्यानंतर खाजगी इसम अल्ताफ शेख यांना माझा काहीतरी संशय आल्याने त्यांनी माझा फोन उचलला नाही तसेच दि. 31/03/2024 रोजी देखील अल्ताफ शेख यांनी माझा फोन उचलला नाही व त्यानंतर मोबाईल स्विच ऑफ केला होता, व त्यानंतर देखील त्यांनी मला संपर्क केलेला नाही व मी त्याना फोनद्वारे संपर्क केला असता त्यांनी माझा फोन उचलला नाही त्यामुळे खाजगी इसम अल्ताफ शेख यांनी माझ्याकडे केलेली 12000/-रुपये लाच रक्कम ते भविश्यात माझ्याकडुन स्वीकारणार नाही, अशी माझी खात्री झाली आहे. त्याअनुषंगाने सापळा कारवाई पुर्णतः स्थगित करण्यात यावी व दिनांक 30/03/2024 रोजी खाजगी इसम अल्ताफ शेख यांनी माझा मुलगा शिवप्रतिक खराद याचेविरूध्द शेवगाव पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या गुन्हयामधुन मुलाला बाहेर काढण्यासाठी तसेच गुन्हयामध्ये मदत करण्यसाठी शेवगाव पोलीस स्टेशनचे एपीआय माळी यांचेकरीता 12,000/- रूपये लाचेची मागणी केलेली असुन खाजगी इसम अल्ताफ शेख,रा.बालमटाकळी,ता. शेवगाव,जि. यांचे विरुध्द कारवाई करण्यात यावी असा जबाब दि.14/11/2024 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहिल्यानगर येथे पोनि आल्हाट यांचे समक्ष दिला. आज रोजी पोनि आल्हाट यांनी माझेशी संपर्क केले प्रमाणे मी त्यांची शेवगाव येथे भेट घेतली. तेथे त्यांनी दि.30/03/2024 रोजी खाजगी इसम अल्ताफ शेख यांनी एपीआय माळी यांचेकरीता माझेकडे 12,000/- रूपये लाचेची मागणी केली असल्याने त्यांचेविरुध्द गुन्हा दाखल करणेबाबत वरिष्ठ कार्यालयाची परवानगी प्राप्त झाली असल्याचे कळविले.खाजगी इसम अल्ताफ शेख यांचेबाबत मी माहिती घेतली असता त्यांचे नाव अफ्ताब शेख रा.बोधेगाव, ता.शेवगाव, जि.अहिल्यानगर असे असल्याचे समजले तरी दिनांक 30/03/2024 रोजी लाच मागणी पडताळणी कारवाई दरम्यान शेवगाव पोलीस स्टेशन येथे 16.45 [illegible] खाजगी इसम अफ्ताब शेख रा.बोधेगाव, ता.शेवगाव, जि.अहिल्यानगर यांनी माझा मुलगा शिवप्रतिक खराद याचेविरूध्द शेवगाव पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या गुन्हयामधुन मुलाला बाहेर काढण्यासाठी तसेच गुन्हयामध्ये मदत करण्यासाठी एपीआय माळी, शेवगाव पोलीस स्टेशन यांचेकरीता 12,000/- रुपये लाचेची मागणी केलेली असुन माझी खाजगी इसम अफ्ताब शेख रा.बोधेगाव, ता.शेवगाव, जि.अहिल्यानगर यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

13. Action taken: **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SAMADHAN CHANDARBHAN NAGARE(I (Inspector)) / PCMH78728

or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SAMADHAN C...
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PCMH78728

ठाणे अंमलदार
शेवगाव पोलीस स्टेशन